# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## विद्यापीठ क्रीडा मंडळ

जा. क्र. विक्रीमं/८ २९/२०८५.

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७

दिनांक : २०/११/२०१७

प्रति,

| | |
|---|---|
| प्रा. सुभाष देशमुख (अध्यक्ष) | सी. डी. जैन महा. श्रीरामपूर |
| प्रा. संजय धोपावकर | पेमराज सारडा महा., अहमदनगर |
| श्री. सतिश रासकर | एन. ए. बी. संचालित अंधशाळा,<br>अशोका टॉकीजरोड, वार्ड नं. २, ता. श्रीरामपूर,<br>जि. अहमदनगर |

सस्नेह नमस्कार,

**विषय : आंतरविभागीय वेट/ पॉवर लिफ्टींग (मुले) संबंधित खेळाच्या निवड समिती सदस्यांच्या नियुक्तीबाबत...**

विद्यापीठ क्रीडा मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार सन २०१७-२०१८ या वर्षाकरिता आंतरविद्यापीठ स्पर्धेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रतिनिधित्व संघ निवडावयाचा आहे.

संबंधित कामासाठी विद्यापीठ क्रीडा मंडळाने निवड समिती नेमलेली आहे. या समितीचे सदस्य म्हणून आपली नियुक्ती करण्यात आलेली आहे, हे कळविण्यास आनंद होतो. खाली दिलेल्या स्पर्धेच्या कार्यक्रमानुसार आंतरविभागीय/निवड चाचणी स्पर्धा होणार असून त्यामधून गुणवत्तेनुसार संबंधित खेळाडूंचा खेळ पाहून पोझिशनप्रमाणे (स्थाननिहाय) विद्यापीठाचा संघ निवडावयाचा आहे. संबंधित विद्यापीठाचा संघ निवडताना खालील गोष्टी कृपया विचारात घ्याव्यात :

(१) आपण निवडीची शिफारस केलेल्या खेळाडूंची नावे कृपया जाहीर करु नयेत. याबाबतीत गुप्तता ठेवावी.

(२) आपण निवडीची शिफारस केलेल्या संघाची यादी बंद पाकिटात विद्यापीठ क्रीडा मंडळाचा प्रतिनिधी नसल्यास आपणापैकी (निवड समिती सदस्यापैकी) एकाने मा. उपकुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे ७ यांच्याकडे प्रत्यक्ष आणून द्यावी. तसेच, विद्यापीठ क्रीडा मंडळातील प्रतिनिधी स्पर्धेच्या वेळी हजर असतानाही बंद पाकिटावर 'मा. उपकुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे ७' हाच पत्ता असावा.

(३) स्पर्धेच्या वेळी त्या ठिकाणी होणारे सर्व सामने प्रत्यक्ष पाहून संघाची निवड करावी.

(४) या स्पर्धेत आपला नातेवाईक खेळाडू असल्यास कृपया आपण ही जबाबदारी स्वीकारु नये (भाऊ, बहीण, चुलत भाऊ, भावाची व बहिणीची मुले, तसेच पत्नीकडील नातेवाईक व इतर प्रकारचे जवळचे नातेवाईक).

(५) स्पर्धेच्या वेळी आपण कृपया निवड समितीच्या व्यतिरिक्त इतर कोणतीही जबाबदारी स्वीकारु नये (स्पर्धेच्या वेळी पंच म्हणून उभे राहणे, ओळखीच्या खेळाडूंना अथवा संघास मार्गदर्शन करणे, तसेच आलेल्या संघव्यवस्थापकांशी जवळीक साधणे, स्पर्धेच्या वेळी खेळाडूंच्या नातेवाईकांशी अगर खेळाडूंच्या ओळखी असलेल्यांशी जवळीक करणे, इत्यादी). क्रीडा मंडळ प्रतिनिधींनी विनंती केल्यास व नियोजित पंचाबद्दल शंका उपस्थित झाल्यास पंच म्हणून कार्य केल्यास हरकत नाही.

(कृ. मागे पहा